# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक २ | मुंबई | ऑगस्ट, २०१६ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## 'मय'कारी

—सुहासिनी कीर्तिकर

तिचे वडील एकारान्त आडनाव असलेले कोकणस्थ ब्राह्मण. आई मंगळोरी सारस्वत. दोघेही तांब्याच्या लालसर देखणेपणाची झाक घेऊन आलेली गौरवर्णी. नाकेली. तेज नजरेची. तल्लख बुद्धीची. आई शाळेत शिक्षिका. पण नवऱ्याच्या समाजकार्याला मनापासून 'मम' म्हणणारी. त्याच्या झांझावाती राजकारणात खांद्याला खांदा लाऊन उभी असणारी. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या तुफानी काळात यांच्या घरी अनेक पुढारी, राजकारणी, समाजकारणी, शिक्षणशास्त्रज्ञ यांचा मुक्कामच असायचा. त्याला नाटक-सिनेमाक्षेत्रही अपवाद नव्हते. आचार्य अत्रे, एस्. एम्., जॉर्ज फर्नांडीस, रवी बापट, डॉ. अ. ना. भालेराव... कितीतरी मंडळी घरातलीच. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यावर हे नगरसेवक झाले. राजकारणाचा राबता वाढला. फर्डे वक्तृत्व, देखणे व्यक्तिमत्व आणि तेज (थोडीशी आक्रमक) बुद्धी यामुळे त्यांचे कर्तृत्व झळाळून उठले. यांनीच आपल्या पत्रकारितेचा बाणा राखून मुंबई पत्रकार संघाची स्थापना केली, तिला स्वतंत्र इमारत (वास्तू) मिळवून दिली. आजही तेथे त्यांच्या स्मृत्यर्थ व्याख्यानमाला आयोजित केली जाते. यांनी फड गाजवले, रंगभूमी गाजवली अन् चित्रपटसृष्टीही. पत्रकारितेत त्यांचा हातखंडा होता. आई या सगळ्यातच सहभागी. लता मंगेशकर लहान असताना तिला टायफॉईड झाला होता; तर म्हणे तितके दिवस या आईने तिची मनोभावे सेवा केली. डॉ. रघुनाथ माशेलकर हे वैज्ञानिक या आईचे विद्यार्थी. गरीबीतून वर आलेले. तर म्हणे; या शिक्षिकेने त्यांना ते 'युनियन हायस्कूल' मध्ये असताना पैशांची, जेवणाची मदत केली होती. या जोडप्याला दोन मुली. त्यांच्यासारख्याच सुंदर, देखण्या, फर्डे वक्तृत्व गाजवणाऱ्या, तेज बुद्धीच्या, चमत्कार वाटावा इतक्या तल्लख स्मृतीच्या, कर्तृत्ववान. एकीचं नाव प्रतिभा. दुसरीचं वसुंधरा. (सांगायला नकोच वेगळेपणाने की त्यांचे आईवडील म्हणजे अप्पा पेंडसे आणि नंदिनी पेंडसे)

प्रतिभा मराठी घेऊन मुंबई विद्यापीठातून एम.ए.ला पहिली आली. पण पुढे तिने प्रियतम व्यक्तीशी लग्न करण्यासाठी धर्म बदलला; तिचे आईशी संबंध पार दुरावले. वसुंधरा संस्कृत घेऊन एम. ए. झाली. ती जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीची मानकरी होती. आपल्या महाविद्यालयीन जीवनात या दोघी बहिणी 'अजंठा शिल्प' म्हणून ओळखल्या जायच्या. मुलामुलींशी थोडं धिटाईने वागायच्या. प्रतिभा पेंडशांपासून दुरावल्यावर उरली वसुंधरा. जॉर्ज फर्नांडिसने विवाहासाठी घातलेली मागणी हिने धुडकावली. अन् ती प्रेमात पडली क्रिकेटवीर सुधीर नाईकच्या. 'तुझ्या सेंट, अत्तराचा खर्चही त्याला परवडणार नाही'... असा अप्पांनी धोका दाखवला. धाक घातला. पण ही अप्पांचीच लेक. कशालाही बधली नाही. मग ती झाली सौ. वसुंधरा पेंडसे-नाईक. वर्षभरातच तिला मुलगी झाली. राधिका! यावेळी बाळंतपणाला म्हणून माहेरी आलेली वसुंधरा परत सासुरवाडीला गेलीच नाही. राधिका एक महिन्याची असताना अप्पा गेले. आई एकटी. बहीण दुरावलेली. अशा वेळी आईची जबाबदारी निभावत सुधीरसह वसुंधरा अप्पांच्याच घरी विसावली ती कायमची. आप्पांचा वसा चालवत राहिली.

हा वसा अनेकार्थांनी तिने खऱ्या अर्थाने चालवला. सुरुवातीची पाच वर्षे ती विल्सन कॉलेजमध्ये संस्कृतची प्राध्यापिका होती. त्यावेळचे तिचे विद्यार्थी आताआतापर्यंत तिला भेटत असत. त्यानंतर तिने हे क्षेत्र सोडले. ती 'लोकप्रभा'ची संपादक झाली. त्याआधी काही काळ ती 'म. टाईम्स'मध्येही होती म्हणा. शिरीष पै या पहिल्या स्त्री-संपादक. पण 'मराठा' त्यांच्या वडिलांचे; म्हणजे घरचेच होते. या अर्थाने पहिल्या स्त्री संपादकपदाचा मान वसुंधराचाच - असे ती मानायची! 'लोकप्रभा'ला तिने चांगलं रंगरूप दिलं. माणसं, पत्रकारमंडळी जोडली. पण स्वभाव तेज. बाणा 'मोडेन; पण वाकणार नाही' - असा. मग ती काही काळ 'नवशक्ती'ची संपादक झाली. पण 'मॅनेजमेंट'च्या व्यावसायिक काव्यांना ती बधली नाही. मग तेही काम सोडले. 'अखिल भारतीय साहित्य महामंडळा'ची ती अध्यक्ष झाली. पहिल्या स्त्री अध्यक्षपदाचा इथेही तिचाच मान.

या तिच्या महामंडळाच्या कारकिर्दीतच माझी तिची अधिक ओळख झाली. कारण मी याच काळात अ. भा. म. साहित्य महामंडळाची कार्यवाह म्हणून काम पाहिले. आजही तिला जवळून ओळखणारे माझी या कामाबद्दल मनापासून पाठ थोपटतात! का? तर तिच्याबरोबर तोडीस तोड मी काम केले म्हणून! कारण ते कठीणच होते. दिलेली वेळ काटेकोर पाळायची. काम तत्परतेने, परिपूर्ण असेच करायचे. अहवाललेखनात एकही चूक होता कामा नये. आयत्या वेळी भाषण करायला गुणवत्ता राखून तयार असायचे. संपर्क साधण्याची हातोटी हवी. महामंडळाची आणि साहित्य संघाची प्रतिष्ठा राखायची. हिशोबात चोख असायचे. कार्यशाळा, वर्धापनदिन, 'वार्षिक अंक', परिसंवाद, चर्चासत्र आणि अ.भा.म.साहित्य संमेलन... आदी नियोजनात काडीचीही चूक असता कामा नये. महामंडळाच्या सभांचे, प्रवासाचे आयोजन नीटच करायचे. मुख्य म्हणजे तत्त्वांशी कुठेच तडजोड न करता अध्यक्षांच्या खांद्याला खांदा लावून वावरायचे. वसुंधराबाई अध्यक्ष असताना इतकं सगळं साधायचं? इतरांच्या दृष्टीने ही सारी परीक्षा घेणारी कसरतच होती. खरंही होतं ते. तिचा कामानिमित्त कधी घरी फोन आला तर माझ्या मुली गंमतीनं म्हणायच्याही, 'आई, तुझ्या 'बॉस'चा फोन आहे.' अगदी इवल्याशा, नकळत केलेल्या चुकीलाही तिच्याकडे क्षमा नव्हती.

पण मला वाटतं, याचमुळे (म्हणजे तिच्या या स्वभावामुळे, कार्यपद्धतीमुळे) आम्ही पुढे जीवाभावाच्या मैत्रिणी झालो. 'तत्त्वांशी कुठेही तडजोड नाही' - ही तिची वृत्ती आजच्या काळात विलक्षण टोकाची (काही वेळा गंमतीचीही!) होती. काही उदाहरणं आज आठवताहेत. महामंडळाचा गोव्याला वर्धापनदिन साजरा होणार होता. तीन दिवस परिसंवाद, एक दिवस महामंडळाची बैठक... असा आखीव कार्यक्रम होता. त्या मला म्हणाल्या, ''बाई, त्यानंतर आम्ही आमच्या कुलदैवताचे दर्शन घ्यायला जाणार आहोत. म्हणून माझी आई, मुलगी, सुधीर... सगळेच बरोबर असतील. खर्च अर्थातच माझाच असणार आहे. पण जर तुम्हाला तुमच्या मुलींना बरोबर घ्यायचे असेल तर घ्या. बैठकीनंतरचा अर्धा दिवस भटकायला मिळेल.'' अधिक खर्चाचं काही दडपण नव्हतंच. मुली तयार झाल्या बरोबर यायला. म्हणाल्या, ''आईला, बाकीचे तीन दिवस आमचे आम्ही 'जीवाचा गोवा' करू.'' मग आम्ही एकत्र गेलो. आधी कळविल्याने हॉटेलमध्ये आम्ही अधिकच्या खोल्या स्वखर्चाने घेतल्या होत्याच. एक तीन बेडस्ची मोठी खोली अन् दोन दोघं दोघं राहू शकतील अशा दोन खोल्या. इथं वसुंधराबाईंचा तत्त्वनिष्ठ बाणेदारपणा आडवा आला! कारण दोघांची एक खोली महामंडळाच्या मालकीची ना! बाईंनी काय करावं? तीन जणांच्या खोलीत त्यांची मुलगी, आई अन् नवरा राहिला. दोन जणांच्या खोलीत माझ्या मुली राहिल्या अन् महामंडळाच्या त्या अधिकृत खोलीत मी अन् वसुंधरा! अध्यक्ष अन् कार्यवाह! माझी आपली समजूत होती की तीन जणांच्या

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

रूममध्ये आम्ही तिघी (मुली अन् मी) दोन जणांच्या खोलीत तिची मुलगी अन् आई आणि आणखी एका खोलीत सुधीर-वसुंधरा अशी नवरा बायको रहातील. पण नाही. 'तत्त्वाचा बंदा जीव...!' तत्त्वपालनाबाबतीत असा करडेपणा असल्याने अनेकांना ते विचित्र वाटायचेच; पण अनेकांना त्या 'नडायच्या.' या तत्त्वनिष्ठेचं आणखी एक अव्यवहारी वाटावं असं उदाहरण. महामंडळाच्या अध्यक्ष झाल्यावर त्यांनी महामंडळाला शिस्तशीर आकार आणला. जुन्या रखडलेल्या बाबी मार्गाला लावल्या. अहो; सरकार दप्तरी महामंडळाच्या कार्यकारी मंडळावर अगदी दत्तो वामन पोतदारांपासून अनेक नावे तशीच होती. कुणी नवीन कार्यकारिणी धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात दाखलच केलेली नव्हती. मग काय? अशांची मृत्यूपत्रे सादर करणे, ना हरकत प्रमाणपत्रे त्या संस्थांकडून मिळवणे इ. सुरू झाले. संस्थाही महाराष्ट्रात आणि इतर ठिकाणी सर्वदूर पसरलेल्या. शिवाय आयुक्तांच्या कार्यालयाचा सरकारी कारभार! फार फार दमछाक झाली सारे रुळावर आणताना. पण मुद्दा तो नाहीच. या कार्यालयात जाण्यायेण्याच्या फेऱ्यांबाबतची गंमत आहे ही. त्या तेव्हा 'राज्यभाषा विकास'मध्ये गुंतत चालल्या होत्या. तर काही वेळा वरळीहून परतताना त्या पुढे 'मेट्रो'पर्यंत टॅक्सी न्यायच्या. 'साहित्य संघा'पर्यंत आले की टॅक्सीभाडे नोंदायच्या. तेवढेच भाडे महामंडळाकडून. पुढचे भाडे त्या स्वतः भरायच्या! पण मला वाटतं हाच खरा सच्चेपणा. जो मला आणि त्यांना जवळ आणायला कारणीभूत झाला. याच काळात 'संमेलन महाकोष' त्यांच्यामुळे निर्माण झाला. बेळगाव सीमाप्रश्नासाठी महामंडळाने धरणे धरले. संगणकीय मराठी भाषेबद्दल खास चर्चासत्र झाले. यश आले नाही; पण 'को.म.सा.प.'ला महामंडळात सामावून घेण्याची आमची धडपड झाली.

या साऱ्या कामांत त्यांनी मला सतत बरोबरीनं वागवलं. मग विलासराव देशमुख असोत, मनोहर जोशी असोत, रामकृष्ण मोरे असोत, उल्हासदादा पवार असोत वा 'पु.लं'ची शेवटची रुग्ण शय्येवरील भेट असो; त्या मला सन्मानानं घेऊन जात. ओळख करून देत. पुढे म्हणतही, 'या बाईंमुळे मी हे काम करू शकतेय.' आजकाल कोण असं म्हणतं? 'बाई माझ्यासारख्याच कठोर, तत्त्वनिष्ठ आहेत' - ही माझ्याविषयीची त्यांची भावना आम्हाला पुढे मैत्रीच्या वाटेवर घेऊन गेली. या महामंडळाच्या माझ्या कारकिर्दीतच माझ्या कंबरेने दगा दिला. तर माझा भाऊ डॉक्टर असूनही वसुंधराबाईंनी 'चला बाई' करत मला ताबडतोब वेंगसरकरां-कडे नेलं. काहीही गरज नसताना हा तत्परताभाव. (पुढे मी महिनाभर माहेरीच होते म्हणा! पण वसुंधरांचे हे वागणे आज आठवतेय!) हा तत्परता भाव, इतरांना मदत करणे त्यांचा स्थायीभावच होता. साहित्य संघाच्या शिपायाचं घर बेकायदा म्हणून पाडण्यात आलं अंधेरीला. तर वसुंधराबाईंनी विलास अवचटांना सांगून त्यात लक्ष घातलं. त्याला निवारा मिळवून दिला. मुरली देवरा त्यांना राखी पौर्णिमेला साडी भेट देत. त्याचप्रमाणे त्या मला न चुकता गुरूपौर्णिमेला फोन करीत. महामंडळाचा कार्यकाल संपल्यानंतर त्या राज्यभाषा विकासच्या आधी उपसंचालक, नंतर संचालक झाल्या. तेथल्या प्रत्येक उपक्रमात त्या मला सहभागी करून घेत. (आधी डॉ. सुरेश नाडकर्णी माझ्या संदर्भात असे करीत. आता वसुंधरा...) त्या तेथून निवृत्त होताना संचालक म्हणून त्यांनी माझ्या नावाची शिफारस केली होती. हे मी कसं बरं विसरेन? याचं कारण म्हणजे कार्यवाह म्हणून माझी महामंडळावर भूमिका संपल्यावरही वसुंधरा माझ्या जवळच्या म्हणूनच राहिल्या. त्यांच्या मुलीच्या लग्नाचा घोळ, आई-बहिणीचा गुंता, घर-संसाराचे प्रश्न त्या माझ्याशी आत्मीय म्हणून वाटून घेऊ लागल्या. 'मी तुम्हाला माझी मैत्रीण मानते बाई' या वाक्यात सच्चेपणाच होता. म्हणूनच त्या मनाने विचलीत असल्या की त्यांची आई मला फोन करून सांगायची, 'एकदा वसुला भेटून जा. तुम्ही आलात की तिला आधार वाटतो.'

हा आधार परस्परावलंबी होता. मला त्यांचा वाटायचा, त्यांना माझा वाटायचा. सच्चेपणा हा त्याचा पाया होता. पुढे त्यांची आई गेली. जाताना काम सोपवावं तसं म्हणून गेली, 'माझ्या वसुला सांभाळा'. पण कोण कसं सांभाळणार? त्यांना कॅन्सरसारखा दुर्धर आजार जडला. पहिल्या ऑपरेशनच्या वेळी त्यांनी मला बोलावलं होतं. सुधीर, राधिका अन् मी. हॉस्पिटलमधली 'ड्युटी' आम्ही तिघांनी वाटून घेतली होती. मला म्हणायच्या, 'बाई, मला खरंच तुम्ही आपल्या वाटता. मी बोलावलं तर चालेल नं?'' माझ्या मुलीच्या लग्नात, नातीच्या जन्मानंतर त्यांनी हक्कानं त्यांना भेटी दिल्या. राधिकाच्या लग्नात विशिष्ट भेट माझ्याकडून मागून घेतली. म्हणाल्या, 'मी अहेर घेतला नाही. पण तुम्ही माझी मैत्रीणच आहात किंवा त्याही पलीकडच्या.' स्वतःला घेतली अगदी तशीच साडी मला घेतली त्यांनी.

'त्याही पलीकडच्या' असं मला मानणाऱ्या वसुंधराबाई आता पार पलीकडे गेल्या आहेत. वैजयंतीच्या मुलीला त्यांनी खास पाकीट दिलं, त्यावर त्यांनी अगदी पहिल्यांदाच लिहिलं होतं - 'वसुआजीकडून' नाहीतर एरवी आमची संबोधनं नेहमीच 'अहो बाई'ची! जाण्या आधी हेही जवळचं नातं त्या जोडून गेल्या म्हणायच्या. 'वसुआजीचं!'

त्या गेल्या तर 'दूरदर्शन'कडे त्यांच्या 'अमृतमंथन'ची एकही ध्वनीचित्रफीत उपलब्ध नव्हती! सुहासिनी मुळगावकर, विजया जोगळेकर यांच्या सहकार्याने त्यांनी तेरा वर्षे 'अमृतमंथन'चा संस्कृतवर आधारीत कार्यक्रम लोकप्रिय केला होता. त्याची एकही चित्रफीत नसावी? आता त्यांच्या आठवणींची चित्रफीत मात्र माझ्या मनात फिरते आहे.

हे म्हणजे 'मयसभे' सारखेच झालेय्. त्या आहेत, आहेत असं वाटतेय् तर वास्तवात त्या आता नाहीतच. त्या नाहीत, नाहीत असं म्हणावं तर; माझ्या आठवणींतून तर त्या जीवंतच आहेत. माझी ही साम्यवादी, सच्ची मैत्रीण अशीच सदैव जीवंत राहो... तिला माझा लाल सलाम!

*

# पाठारे प्रभु सोशल समाजाची अभंग यात्रा

सोशल समाजाची अभंगयात्रा शनिवार दि. १६ जुलै २०१६ रोजी ठाकुरद्वारी, चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात संपन्न झाली. प्रारंभी समाजाच्या सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी उपस्थितांचे स्वागत केल्यावर समाजाचे विश्वस्त श्री. अजित तळपदे यांनी व्यंकटेशाला श्रीफळ व हार अर्पण केला व पेढ्यांचा नैवेद्य दाखवला. त्यानंतर आपल्या मनोगतामध्ये श्री. अजित तळपदे यांनी सर्व ज्ञातिबांधवांना आवाहन केले की, आपल्या घरातील युवा पिढीलाही सोशल समाजातील कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे. सोशल समाजाचे इतर कार्यक्रम मध्यंतरीच्या काळात बंद झालेले असतानाही अभंग यात्रा मात्र सोशल समाजाने कायम चालू ठेवली होती, याचा उल्लेख करून त्यांनी त्या अर्थाने ही 'अभंगयात्रा' नसून 'अखंड यात्रा' आहे असा समर्पक विचार मांडला. नंतर समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी सूत्रे हाती घेतली.

स्वाती राणे यांच्या ओघवत्या निवेदनाच्या साथीने नव्या-जुन्या कलाकारांनी आपली गानसेवा विठ्ठलचरणी रुजू केली. वरुण राणे या बालकलाकाराच्या गजाननाच्या स्तवनाने प्रारंभ झालेल्या या अभंगयात्रेची सांगता सौ. रॉनिका विजयकर यांच्या 'स्वामी कृपा कधी करणार' या भैरवीने झाली. या संगीत वारीमध्ये सर्वच कलाकारांची गीते बहारदार झाली. पण खास उल्लेख करायचा म्हटला तर, डॉ. हर्षद विजयकरांचे 'सूर निरागस हो', सौ. आसावरी धुरंधरांचे 'क्षणभर उघडी नयन देवा', सौ. सीमा कीर्तिकरांचे 'राधा कृष्णावरी भाळली', प्रदीप राणे यांचे 'मन तरपत हरी दर्शनको आज'', क्षमा कोठारे यांचे 'बोले स्वर बासुरीचा'', रॉनिका विजयकरांचे 'अरे अरे श्रीहरी', देवश्री धुरंधरांचे 'जय गणेशा', विद्युत नायकांचे 'कैवल्याच्या चांदण्याला' ही गाणी प्रेक्षकांच्या खास पसंतीस उतरली. रजनी कोठारे यांनी सादर केलेले ज्योत्स्ना भोळे यांच्या स्वरातील 'देवा बोला हो माझ्याशी' हे गाणे नाविन्यपूर्ण वाटले.

या अभंगयात्रेला संवादिनीवर श्री. विजय कुडाळकर, श्री. वसंत मोरे व श्री. शेषनाथ पावसकर यांनी साथ केली तर; तबल्यावर श्री. प्रदीप राणे व श्री. अवधूत चौबळ यांनी ठेका धरला. साईड ऱ्हिदम श्री. गजानन मांद्रेकर यांचा होता. ध्वनि-व्यवस्था बाबू साऊंडची होती. उपस्थितांना सौ. योगिता नवलकर यांच्याकडून पेढ्यांचा प्रसाद व कॉफी देण्यात आली. समाजाच्या सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी समाजाच्या विश्वस्त श्रीमती प्रमिला तळपदे यांच्याकडून रु. २००० ची देणगी प्राप्त झाली.

या अभंगयात्रेसाठी पाठारे प्रभु चॅरिटीजचे बहुमोल सहकार्य लाभले. तसेच प्रॅक्टीससाठी ठाकुरद्वार येथे श्री प्रदीप व सौ. मेघना राणे यांनी सर्वतोपरी व्यवस्था पाहिली तर; खार येथे समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे व सौ. योगिता नवलकर यांनी आयोजन केले. गायक कलाकारांना श्री. राजन चितळे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला श्रोत्यांची उपस्थिती भरगच्च होती. व्यंकटेशाला श्रीफळ व हार श्री. अभिजित विजयकरांतर्फे देण्यात आला.

प्रणाली राणे, वैदेही राणे, सुरूपा राणे देवरुखकर, चिंतामणी कीर्तिकर, अक्षदा तळपदे, योगिता नवलकर, वीणा अजिंक्य, स्नेहा राणे, आदिती विजयकर, सुहास विजयकर यांच्या सहभागाने कार्यक्रमाची रंगत वाढली.

*

लेख क्रमांक ७

## दूरदेशातून-

# कर्तव्य सर्वात श्रेष्ठ

-सुजन राणे
panditsujanrane@yahoo.com

संस्कृतमध्ये कर्तव्याची व्याख्या ‘कर्तुम योग्यम् कर्तव्यं’ असं कॉलेजमध्ये असताना वाचल्याचं आठवते, म्हणून कर्तव्य हे सर्वात श्रेष्ठ आहे. असो. नुकतंच बोस्टन, पॅरिस, सॅन बर्नाडिनो, ओरलँडो, इस्टम्बूल, ढाका, डल्लास इथे आणि त्याच्या अगोदर मुंबईत आतंकवाद्यांनी काही बॉम्बस्फोट घडवून आणले आणि त्यामुळे अनेक निरपराधी लोक मारले गेले. अशावेळी ‘जगात हे काय चाललं आहे?’ असा प्रश्न आपल्या सर्वांना खचितच भेडसावत असेल. एका बाजूला धर्म, त्यातील आदर्श आणि त्याचे कट्टरपंथीय अनुयायी व दुसऱ्या बाजूला त्या कट्टरपंथीय अनुयायांची दुसऱ्या धर्माच्या किंवा अन्य जीवनशैलीशी सहमत न होणं आणि त्याच्यासाठी धड उडवण्यासारखी अत्यंत अमानुष कृत्यं करणं. हे सर्व जरी माणसाच्या बुद्धीपलीकडे असलं तरी अशी अमानवी कृत्यं थांबवण्याचीच काळाची गरज आहे. अनुभव सांगतो की अशी अमानुष कृत्य करण्यासाठी मुलांना लहान वयातच प्रवृत्त केलं जातं. पण त्या लॉजिकने मुलांना लहान वयात चांगल्या मार्गाचं अवलंबन करण्यासाठी नक्कीच तयार करता येईल. पण हे मिळवण्यासाठी आपल्याला किती वेळ थांबावं लागेल हे ठरवणं कठीण आहे. अशा परिस्थितीत लवकर उद्दिष्ट गाठण्याकडे आपला कल असतो. अशावेळी लोकांचं स्वातंत्र्य धुडकावून त्यांच्या भल्यासाठी त्यांच्यावर सक्तीने शिस्त लादावी लागते. त्याच्यासाठी पोलीस आणि सैन्याच्या जवानांना आपले प्राण गमवावे लागतात ही दुर्दैवी व अपरिहार्य बाब आहे.

एखाद्या राष्ट्राचं सार्वभौमत्व व एकता टिकवण्यासाठी काही पावलं उचलावी लागतात आणि त्यासाठी त्यागसुद्धा करावा लागतो. त्यातील पाहिलं पाऊल म्हणजे सर्वांना एकच कायदा व कुठल्याही परिस्थितीत तो सर्वांना सारखाच लागू पडला पाहिजे ही खबरदारी घ्यावी लागते. अमेरिका ह्या बाबतीत अत्यंत दक्ष आहे. रिपब्लिकन पार्टीचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्पनी काढलेल्या विद्यापीठात त्यांनी काही आर्थिक घोटाळे केले, तसंच डेमॉक्रॅटिकच्या उमेदवार हिलरी क्लिंटन यांनी सरकारी कामासाठी आपल्या खासगी ईमेलचा उपयोग केला या आरोपाखाली त्या दोघांची कसून तपासणी झाली व ते सर्व इथे दूरदर्शनवर दाखवण्यात आलं. इथल्या कायदेपद्धतीने ह्या दोघांच्या राष्ट्रपती निवडणुकीत अशा तपासणीमुळे अडथळे निर्माण होतील याची काडीचीही तमा बाळगली नाही. डल्लासमध्ये एका काळ्या माणसाने पाच गोऱ्या पोलिसांना गोळी घालून ठार मारलं, शेवटी त्याला गोऱ्या पोलिसांनी ठार मारलं. तेव्हा तिथल्या काळ्या पोलीसप्रमुखाने कायद्याच्या दृष्टीने ते बरोबर आहे असं दूरदर्शनवर स्पष्टपणे सांगितलं. त्यांनी काळ्या लोकांची बाजू घेतली नाही. राष्ट्रपती ओबामांनी पोलंडमधली नाटोची ट्रीप लवकर संपवून अमेरिकेला धाव घेतली. केवळ लोकांना सांगायला की अमेरिकेची एकता सर्वात महत्त्वाची असून इथे जातीयवादाला थारा नाही. ही एकता टिकवण्यासाठी इथल्या पोलिसांना स्वत:चे प्राण गमवावे लागतात ही वर म्हटल्याप्रमाणे त्यागाची बाजू आहे.

एखाद्या कुटुंबात कुटुंबप्रमुख जर कमकुवत असेल तर त्या कुटुंबातले लोक त्याचं ऐकत नाहीत आणि त्यामुळे ते कुटुंब अधोगतीला जाण्याची शक्यता असते. राष्ट्राचं भवितव्य तसंच असते. सरकार जर मजबूत नसेल तर राष्ट्राचं नुकसान व्हायला वेळ लागत नाही, कारण राष्ट्रद्रोही लोक अशा परिस्थितीचा गैरफायदा घेण्यास कचरत नाहीत. सरकारने कठोर भूमिका पत्करून त्यांना फासावर लटकवण्यात वेळ घालवता कामा नये. शेवटी राष्ट्राचं हित हे त्यांच्या फाशीपेक्षा महत्त्वाचं आहे. जेव्हा नथुराम गोडसेंना गांधी हत्येबद्दल फाशी सुनावण्यात आली तेंव्हा ते म्हणाले की, ‘मला गांधींबद्दल आदर आहे. पण माझं राष्ट्र मला अधिक प्रिय आहे.’ स्वत:च्या गुन्ह्याबद्दल केव्हाही फाशी जाण्याची त्यांची तयारी होती. राष्ट्रप्रेमापोटी हा केवढा मोठा त्याग!

या संदर्भात भगवद्गीतेतले कर्मब्रह्मार्पणयोग या चौथ्या अध्यायातले खालील श्लोक अतिशय अर्थपूर्ण आहेत. काही वाचक हे विचार जुन्या पद्धतीचे किंवा पौराणिक आहेत अशी टीका करणं साहजिक आहे. परंतु नीट विचार केला तर त्या श्लोकांतला अर्थ व तत्त्वज्ञान कुठल्याही युगाला लागू पडण्यासारखं आहे, हे त्यांना नक्की पटेल.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ! अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहं ।।७।।

अर्थ--जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचे प्राबल्य माजते, तेव्हा मी स्वत: अवतार घेतो.

परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। ८ ।।

अर्थ--चांगल्या लोकांच्या संरक्षणासाठी, दुष्टांच्या नाशासाठी आणि धर्म सांभाळण्यासाठी मी जन्मोन्जन्म अवतार घेत असतो.

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मण:। अकर्मणस्च बोद्धव्यं गहना कर्मणो गति: ।।१७।।

अर्थ--कर्म म्हणजे काय, विकर्म म्हणजे काय, अकर्म म्हणजे काय हे सर्व जाणले पाहिजे. कारण कर्माचे तत्त्व फार गहन आहे.

कर्म गाठण्यासाठी किंवा कर्तव्य करण्यासाठी कितीही किंमत मोजायची तयारी पाहिजे कारण फळ मिळण्याची शाश्वती नसते.

*

लेख क्रमांक ५

# अनुवाद-संवाद

-सौ. कल्पना सुभाष कोठारे

| **William Blake** | **गुंफण** |
|---|---|
| Joy and woe are woven fine<br>A clothing for the soul devine, | विणले गेलेत छान धागे सुखदु:खाचे<br>असते ते वस्त्र, स्वर्गीय आत्म्याचे. |
| Under every grief and pine<br>Runs a joy with silken twine, | प्रत्येक हुंदक्याआड अन् दु:खाआड<br>दडुन असतो धागा रेशमी सुखाचा |
| It is right, it should be sob<br>Man was made for joy and woe;b | बरोबर! असंच असायला पाहिजे असतं<br>माणसासाठी सुख दु:ख गुंफलं गेलं असतं |
| And when this we rightly know,<br>Safely through the world we go. | जेव्हा हे त्याला बरोबर उमगतं,<br>तेव्हाच त्याला जगात सुरक्षित तरून जाता येतं - तरून जाता येतं! |

*

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



आलटून पालटून-

## (सा)सुंवाद

**सौ. जयमती जयपाल तळपदे**

दिवाळीला नीताच्या शेजारच्या फ्लॅटमध्ये नवीन चौकोनी कुटुंब रहायला आले. श्री. व सौ. नाडकर्णी, त्यांचा नवीनच लग्न झालेला मुलगा अश्विन आणि सून आस्था. पण ह्या कुटुंबाशी नीट ओळख होण्यापूर्वीच नीता तिचा नवरा रजत, मुलगा ईश आणि सासूसासरे व आजे सासूबरोबर सुट्टी घालवायला लोणावळ्याला गेली. रजतची सुट्टी संपत आल्यामुळे नीता त्याच्याबरोबर मुंबईला परत आली. ईश मात्र आजी आजोबा व पणजीबाईबरोबर तिथेच राहिला. त्याची सुट्टी होती ना अजून आठ दिवस.!

नीताला अजून चार दिवस सुट्टी होती. रजत ऑफिसला गेला की ती मोकळीच असायची. तिची हळुहळू नवीन शेजाऱ्यांशी ओळख होत होती. आस्था व ती समवयस्क असल्याने नीताने एक दिवस तिला दुपारी चहालाच बोलाविले. दोघींच्या गप्पा सुरू झाल्या. बोलण्याच्या ओघात नीताने तिला सांगितले की दोन दिवसांनी तिचे सासूसासरे, आजे सासूबाई व ईश परत येणार आहेत. आस्थाने पटकन विचारले, ‘‘हे सासू सासरे व आजेसासूबाईसुद्धा तुझ्याबरोबरच रहातात?’’ नीता म्हणाली, ‘‘अगं आम्ही, त्यांच्याबरोबर रहातो. हे घर माझ्या सासूसासऱ्यांनी स्वत:च्या हिमतीवर गृहकर्ज घेऊन, काटकसर करून घेतलंय. त्यावर तर त्यांचाच हक्क आहे ना? आमचं लग्न ठरलं, तेव्हा त्यांनी आम्हा दोघांनाही विचारले होते की आम्हाला वेगळे रहायचे आहे का म्हणून. थोडी आर्थिक मदत करण्याचीसुद्धा त्यांची तयारी होती. पण आपण मुली आधीच लग्नानंतर आईवडिलांच्या छत्राखालून निघून सासरी येतो. मग वेगळे रहायचे म्हणजे नवऱ्यालाही त्याच्या आईवडिलांपासून दूर करायचे. आणि शेवटी दोघांनीही रहायचे आपाआपल्या आईवडिलांपासून दूरच. मग निदान एका तरी मायबापाचे छत्र आपल्या डोक्यावर असावे ना? आपलं दुखलं खुपलं बघायला, वेळप्रसंगी धीर द्यायला, काही निर्णय घेताना त्यांच्या अनुभवाचे बोल सांगायला कुणीतरी आपलं मायेचं माणूस जवळ असावं असं आपलं मला वाटतं.’’ ‘‘सगळं खरं गं.’’ आस्था म्हणाली, ‘‘पण ह्या जुन्या लोकांच्या विचारांशी जुळवून घेताना किती तडजोडी कराव्या लागतात. आपलं स्वत:चं म्हणून काही उरतच नाही. सगळं ह्यांचंच ऐका. काहीही केलं की अस्संच का केलं आणि हेच का केलं नाही? आमच्याकडे बघ ना. साधी भाजीसुद्धा मी माझ्या आवडीची, माझ्या पद्धतीची करू शकत नाही. ह्यांच्या घरात पाऊल टाकल्यापासून सासूबाईंचे सुपरव्हिजन चालू झाले. भाजी अशीच कर, त्याला हाच मसाला घाल. अश्विनला हेच आवडतं आणि हेच आवडत नाही. मग माझ्या आवडीनिवडीचं काय?’’

निताला पटकन हसू आले. ‘‘हसतेस काय? खरंच सांगतेय.’’ आस्था म्हणाली. ‘‘हो गं. तू खरंच सांगतेयस. पण जरा त्यांच्या बाजूने विचार कर. तू घरात नवीन. त्या तुला घरातल्या पद्धती, घरातल्यांच्या आवडीनिवडी याबद्दल माहिती देतायत गं. आधी हे सगळं जाणून घे ना. त्यांनी वर्षानुवर्षे हा संसार केलाय. त्यांची काही पद्धत असणार. काही ठोकताळे असणार. त्यांना जे माहीत आहे तेच तुला त्या सांगू शकणार की नाही? तुझी आवडनिवड ही तू त्यांना सांगायची आहे. ती पण त्यांना न दुखावता. त्यांना माहित आहे का की तुला स्वयंपाक करता येतो? कारण आजकाल मुलींना बऱ्याचवेळा स्वयंपाक शिकायला वेळच मिळत नाही.’’ ‘‘काय माहीत?’’ आस्था उत्तरली. ‘मग तू त्यांना सांगायचं ना; की ही भाजी अशी करते, बघू या तुम्हाला सगळ्यांना आवडते का. जरा वेगळी चव कधीतरी बरी वाटते ना? हे बघ. बोलल्याने प्रश्न सुटतात. तूही त्या घरात नवीन आणि त्यांनाही तुझी पूर्ण ओळख नाही, मग एकमेकींना समजून घेण्यासाठी संवाद हा व्हायलाच हवा नाही का? त्यांना कसं कळणार तुझ्या मनातलं? म्हणजे न बोलता दोघींनीही आपआपल्या समजूतीप्रमाणे दुसरीबद्दल मनात अटकळ बांधायची आणि चुकीच्या समजूतीमुळे पुढे पुढे मनात अढी रहाणार. त्यापेक्षा स्वच्छ बोलून मोकळं व्हावं. बोलताना रागाने वैतागून बोलू नये. प्रेमाने पण स्पष्ट बोलावं. आपल्या मनातलं नेमकं समोरच्याला कळेल असं बोलावं. आपण मनमोकळेपणाने बोलतो आहोत हे त्यांना कळायला हवं. आणि मुख्य म्हणजे घरातल्या चार माणसांना एकदम बदलण्यापेक्षा स्वत: थोडं बदलावं. काही गोष्टी अंगवळणी पडल्या की सुद्धा आपल्याला आवडू शकतात.

आमच्याकडे सांगू का, आईकडे नारळाचा वापर खूपच कमी. पण इथे मात्र सढळपणे नारळाची सोय वापरली जाते. पण मी लग्न झाल्यावर सासूबाईंकडून सगळं शिकून घेतलं. या घरातल्या पद्धती, रीतीभाती, सगळ्यांच्या आवडीनिवडी. त्यामुळे ही सर्व माणसं माझी झाली. आधी दिलं मग घेतलं. पण दोन्ही केलं आनंदाने आणि प्रेमाने. अनिच्छेने काहीही केलं नाही. ही माणसं, हे घर माझं आहे, या सगळ्यांना मला आपलसं करायचं आहे असं म्हटलं आणि माझ्यातला ‘मी’ जरा मागे टाकला. आता मी नवीन नवीन पदार्थपण करू शकते. कधीतरी माझ्या आवडीचेही करते. जे पदार्थ घरात कुणालाही आवडत नाहीत ते मात्र आईकडे जाऊनच खाते.’’

‘आमच्या घरात मला हे सगळं अवघडच वाटतंय.’’ आस्था म्हणाली. ‘‘आस्था, तुझ्या मनात आधी आत्मविश्वास आण की, मी हे करणारच. उपाय आपोआप सुचतील तुला. पण डोक्यातले गैरसमज आधी काढ. ही माणसं नवऱ्याएवढीच माझी आहेत असं समज. तुझं लग्न फक्त तुझ्या नवऱ्याशी नव्हे, त्याच्या कुटुंबाशी झालेलं आहे. सगळ्यांचा रागराग करशील तर कधीही आनंदात जगू शकणार नाहीस गं.’’

‘तुझे ठीक आहे गं. तुझ्या सासूबाई प्रेमळ दिसतात’ आस्था सांगायला लागली, ‘‘आमच्याकडे सगळा प्रकारच विचित्र आहे. मी काही करायचं, घ्यायचं म्हटलं ना, की सासूबाई मोडता घालतात. आणि हेच त्यांच्या मुलीने सांगितले की त्यांना लगेच पटते. मग लगेच आपण सांगितलेलं तसेच तिच्या नावावर टाकून करायचं. अस्सा राग येतो ना. आश्विनला सगळं कळतं. पण तो ते हसण्यावारीच नेतो. काही बोलत नाही.’’

‘आस्था, मग तर सोप्पंच काम आहे’ नीता पटकन म्हणाली, ‘‘तू आणि अश्विनने आधी सगळं ठरवायचं आणि तुझ्या नणंदेला पटवायचं. मग ती तिच्या आईला पटवेल. तुला काय तुझं काम झाल्याशी मतलब ना? की तुला त्या कामाचं क्रेडीट हवं आहे! आणि हे बघ आस्था, तू घरात, संसारात अजून नवीन आहेस ना, त्यामुळे त्यांचा विश्वास कमवायला तुला वेळ लागणारच ना? तुझ्या म्हणजे आपल्या नवीन जमान्यातल्या गोष्टी त्यांना पटायला वेळ लागणारच ना गं? हल्ली काळ फार झटपट बदलला नं, त्यांना या वयात एवढं चटकन कसं बदलता येणार? तुझ्या सासूबाई तुझा रागराग करतात का? दुसऱ्यांकडे तुझी निंदा करता का?’

‘‘छे गं असं त्या कधीच करत नाहीत. उलट दुसऱ्यांसमोर वेळ पडली तर माझी बाजूच घेतात.’’

‘‘हो ना? म्हणजे त्यांचा जीव आहे गं तुझ्यावर. हे मुळात समजून घे. त्यांच्या आवडी निवडी जाणून घे. त्यांच्याशी थोड्या गप्पा मार. हे बघ, त्यांनी २५-२६ वर्ष वाढवलेला त्यांचा जीवाचा तुकडा तुला दिलाय ना? त्यांच्याही मनात कुठेतरी काहीतरी गमावल्याची भावना असणारच की नाही? तुला काहीतरी मिळालंय. पण कालपर्यंत फक्त त्यांचा असलेला मुलगा तनमनाने दुसऱ्या कुणाचा झाला आहे. थोडं त्यांच्या भूमिकेत जाऊन बघ. त्यांच्याशी त्यांच्या छोट्या मुलीसारखं वागून बघ. कदाचित त्यांच्यातली ही असुरक्षित असल्याची जाणीव कमी होईल आणि त्यांच्यात फरक पडेल. पण त्यांना बदलण्याआधी स्वत:ला बदलायची तयारी ठेव. थोडं आत्मपरीक्षण कर.’’

आस्था ऐकत होती. पण असं काही होत असतं हे तिला पटत नव्हतं. हे सगळं पुस्तकात ठीक आहे असं वाटत होतं. चहापाणी आटपून ती घरी गेली.

सासूबाई समोरच बसल्या होत्या. जणू काही तिची वाटच पहात होत्या, उलट तपासणी घ्यायला. ‘काय गं, बराच वेळ बसली होतीस?’ आस्थाच्या डोक्यात सणक गेली. ‘‘आता मी कुठे जाऊ नये का? प्रत्येक मिनिटांचा यांना हिशोब द्यायचा की काय?’’

मग एकाएकी तिच्या डोळ्यांसमोर नीताचा प्रसन्न चेहरा आला आणि नकळत ती सौम्य शब्दात म्हणाली, ‘ती नीता खूप छान आहे. खूप गप्पा मारल्या आम्ही आणि मग वेळ कसा गेला ते कळलंच नाही.’’

‘काय एव्हढं बोलत होतात? काय म्हणत होती ती?’’

‘‘आई ती खूप छान बोलत होती. ऑफिसातल्या गंमतीजमती सांगत होती. आम्ही खूप हसलो. तिच्या ऑफिसात ना एक वेडा पारशी आहे..’’ नकळत आस्था सासूबाईंना सांगत गेली आणि त्याही ते ऐकत गेल्या. कधी प्रश्न विचारत गेल्या, कधी हसत गेल्या. आस्था नकळत थोडी मोकळी झाली. तिलाही थोडं

(पान ५ कॉलम ३ वर)

आलटून पालटून-

# तुमच्या आमच्यातला राक्षस

हेमंत विनायकराव तळपदे

आपण सर्व या समाजात वावरत असता नोकरशाही, व्यावसायिक वा धंदेवाईक या बुरख्यात वावरत असतो. बरेचसे दुकानदार अगदी अदबीने ग्राहकांची विचारपूस करतात. बरेचसे नोकरदार आपल्या वरिष्ठांशी बोलताना वाणीचे तारतम्य बाळगून असतात. बरेचसे विद्यार्थी शिक्षकांशी बोलताना आदरयुक्त भाव दाखवून असतात.

पण खरे पाहता त्या भूमिकांमध्ये वावरताना आपल्या मनात कोठेतरी एक राक्षस मनाला कुरतडत असतो आणि मग तो कोणत्या ना कोणत्या रुपात आपले प्रकटीकरण करत असतो.

मला आठवतो तो म्हणजे माझ्या शालेय जीवनातील मित्र शांताराम भोसले. तसे पाहता अत्यंत विनम्र, सुशील जास्त हुशार नसला तरी ५०/६० टक्के गुण मिळवणारा मध्यम विद्यार्थी. पण त्याला मराठी विषयाचा फारच तिटकारा. एकदा सहज माझ्या हाती त्याचे मराठीचे पुस्तक लागले. मी ते पुस्तक थोडेसे चाळले अन् हसावे की संतापावे हेच मला कळेना. कारण या शांतारामाने आपल्या मनातील राग त्या पुस्तकातील लेखक, लेखिका, कवी व कवयित्रींवर चांगलाच काढला होता. त्या काळी प्रत्येक धडा अथवा कवितेच्या प्रारंभी लेखक, कवी यांचा परिचय फोटोसहित देत असत. पण या पठ्ठ्याने त्या फोटोंची आपल्या पेनाने विल्हेवाट लावली होती. आणि काही ठिकाणी तर इरसाल भाषेत त्या विभूतींना शिव्याही दिलेल्या होत्या. काही कवयित्रींना या महाभागाने दाढीही रेखाटली होती. मी त्याला या कृतीचे कारण विचारले तर मंडळींमुळे मला मराठी विषय शिकावा लागतो व गुण कमी मिळाले की बाबांचा मार पडतो हे त्याचे स्पष्टीकरण त्याच्या मनातल्या खोल कप्यातील राक्षस या साहित्यिकावर ओरखडे काढताना अनुभवास आले.

इतकेच काय; आपल्या अगदी जवळचे उदाहरण. एखाद्याने वाडीत नवी कोरी गाडी घेतली व ती सजवून रस्त्यावर उभी केली की त्या गल्लीतील मुले दगडाने वा काठीने त्या गाडीच्या पत्र्यावर असूयेचे ओरखडे काढतात. हे जाणून बुजून अथवा ठरवून केलेले कृत्य नसते तर; त्यांच्या मनातला हा राक्षस कुठेतरी त्याच्या भूमिती रेखाटनाचे प्रात्यक्षिक सहजपणे दाखवत असतो हे मात्र खरे.

चौपाटीवर आणखी एक नजारा नेहमीच पहायला मिळतो. अनेक लहान मुले चौपाटीवरच्या वाळूत किल्ले बांधतात. ते फार कलात्मक मेहनतही घेतात. त्या किल्ल्यांचे बुरूज, भक्कम तटबंदी, वरच्या बाजूस असणारी बाजारपेठ, नैसर्गिक तलाव वगैरे ही मुले आकर्षकपणे तयार करतात आणि मग मनापासून खूष होऊन आपल्यातल्या विश्वकर्म्याच्या अंशाचे ते अवलोकनही करतात. पण तितक्यात त्यांच्यातील एक द्वाड मुलगा धावत येऊन मुद्दामच त्या किल्ल्यावर आदळतो व तो किल्ला उद्ध्वस्त करून फिदीफिदी हसतो. हे त्याच्या मनातल्या कोपऱ्यातील राक्षसाचेच काम असते.

दिवाळीच्या वेळी चाळीतील रहिवाशांना हा अनुभव नवीन नाही. एखादी ताई हिरीरीने दाराबाहेर रांगोळी काढते. रांगोळी काढण्यापूर्वी ती जमीन तांबड्या मातीने सारवते व मग ठिपक्यांची रांगोळी काढते. त्यात निरनिराळे रंग भरून ती रांगोळी आकर्षक करते. या हौसेपोटी ती दिवाळीचे दोन तासही आनंदाने खर्च करते. घरातील माणसे त्या रांगोळीचे कौतुकही करतात. पण चुकून रात्रीच्या वेळी घराचा दरवाजा थोडासा बंद झाला तर १०-१५ मिनिटात ती सुंदर रांगोळी कोणीतरी पाय देऊन विस्कटतो. कारण काय हे कोणास ठाऊक? पण माझ्या मते त्याच मजल्यावरील कोणाच्यातरी मनातील राक्षस हे काम साळसूदपणे करतो.

अशी अनेक उदाहरणे आपल्याला समाजात वावरताना सहजपणे दिसतात. इमारतीच्या रंगवलेल्या भिंतीवर होळीचे रंगीत फुगे मारणे, स्वच्छ जिन्याच्या भिंतीवर तंबाखूच्या पिचकाऱ्या मारणे, ट्रेनच्या गर्दीत स्वच्छ इस्त्री केलेल्या सफेद शर्टवर जाणूनबुजून आपले घामाने डबडबलेले तोंड पुसणे, शांत व रमणीय जागेवर जोरजोरात किंचाळणे, ट्रेनमधून फलाटावर उतरताना कारण नसतानाही उगाचच धक्काबुक्की करणे. इत्यादी अनेक प्रकारात या मनातील राक्षसाचे दर्शन समाजात होत असते. या अशी कृत्ये करणाऱ्याला काय मिळते? हा प्रश्न अनुत्तरीत रहातो. कारण हा मनातला राक्षस सुखावलेला असतो. ही सर्व या राक्षसाची सौम्य रुपेच म्हणावी लागतील. कारण हाच राक्षस कधीकधी तापदायक ठरतो. बलात्कार, जाळपोळ, हुंडाबळी, लूटमार, खून, दंगे, बॉम्बस्फोट या सर्व दृष्कृत्यांमध्ये हा राक्षस समाजाचे अपरिमित नुकसानही करतो. मानव कितीही सुशिक्षित झाला तरी हा राक्षस त्याची पाठ जरादेखील सोडत नाही. संतांचे उपदेश, बोधामृत या राक्षसाचे आपल्या मनात दमन करू शकतात. पण हा राक्षस पूर्णपणे नष्ट होतो हे म्हणणे खरोखरच धाडसाचे ठरेल. असे म्हणतात की...

Every cultured man can be literate but every literate man cannot be cultured.

*

(पान ४ कॉलम ४ वरून)

हलकं वाटलं. अश्विन ऑफिसमधून आला आणि बूटमोजे काढत आईच्या शेजारी बसला. पण का कोण जाणे आज ते आस्थाला खुपलं नाही. सासूबाई अश्विनला सांगत होत्या. 'आज मी आणि आस्थाने खूप गप्पा मारल्या.' त्यांच्या मनातला आनंद त्यांच्या शब्दात दिसत होता. एवढे दिवस अबोल असणारी आपली सून आज आपल्याबरोबर बोलून हसून वागली याचा तो आनंद होता.

'अश्विन, आईंची स्पेशल डीश सांगा न मला.' आस्थाने चौकशी केली. 'अगं आई आलू पराठे खूप मस्त बनवते.' दुसऱ्या दिवशी सकाळीच आस्थाने सासूबाईंना म्हटले, ''आई आपण आज आलू पराठे बनवूया का? मला दाखवा मी बनवते.'' सासूबाईंना बरं वाटले. त्यांनी उत्साहात तिला सर्व नीट दाखवले व शिकवले. सर्व झाल्यावर आस्था म्हणाली, ''माझे पराठे तुमच्याइतके छान झाले नाहीत.'' सासूबाई म्हणाल्या, ''अगं शिकशील हळूहळू.'' आता आस्था त्यांना आपल्या लहानपणीच्या, शाळा कॉलेजच्या आठवणी सांगू लागली. त्यांच्या जुन्या आठवणी विचारू लागली. आवडती गाणी, सिनेमे यावर त्यांच्या गप्पा रंगायला लागल्या. नणंद आली की ती हौसेने तिच्यासाठी काहीबाही बनवायला लागली. सासरी न बनणाऱ्या गोष्टी सासूबाईंना सांगून बनवायला लागली. दोघींमधील अंतर हळुहळू कमी होऊ लागलं. आणि एकदा बोलता बोलता सासूबाई म्हणाल्या, ''तू लग्न होऊन घरात आलीस ना, तेव्हा मला टेन्शनच आलं होतं. कशी वागशील माझ्याशी? आपलं एकमेकींशी पटेल की नाही. काय समज गैरसमज होतील आपले. एकतर लग्न झाल्यावर अश्विन माझ्यापासून लांब जाईल का; असे पण वाटायचे. तू त्याला माझ्यापासून तोडशील का अशी भीती वाटायची. या घरातील रितीरिवाज, संस्कार तू घेशील की नाही? परंपरा पुढे चालवशील की नाही; असं वाटायचं. सुरूवातीला तू अशी गप्प गप्प राहायचीस. कधीतरी दुर्मुखलेली दिसायचीस. तेव्हा मला वाटायचं ही भांडणार एक दिवस माझ्याशी आणि घरातील शांती, आनंद सगळं लयाला जाणार. तुझ्या चेहऱ्यावर कधीकधी इतका राग दिसायचा, तू बोलायची नाहीस पण तुझी नजर खूप काही सांगायची. मग मला खूप निराश वाटायचं. पण आता नाही तसं वाटतं. तुझ्याबद्दल खूप विश्वास वाटतो. तू आता मुलीसारखीच जवळची वाटतेस.''

आणि एकाएकी आस्थाचे डोळे भरून आले. म्हणजे आस्था इतक्या ह्यासुद्धा सुरुवातीला अस्वस्थच होत्या. किती गैरसमज करून घेतले होते मी यांच्याबद्दल. नीता म्हणत होती ते खरं होतं. बरं झालं मला नीतासारखी मैत्रीण भेटली. नाहीतर एखादी माझ्या गैरसमजूतीला खतपाणी घालणारी भेटली असती तर? काय वाट्टोळं केलं असतं मी माझ्या सुखी संसाराचं? ती ताडकन उठली. सासूबाई तिच्याकडे पहातच राहिल्या. पण आता आस्थाला धीर निघत नव्हता संध्याकाळी नीता ऑफिसमधून यायची वाट पहाण्यापुरता. तिने तिचा फोन उचलून नीताचा नंबर लावला. एक मोठ्ठा थँक्स म्हणण्यासाठी.

*

## पाठारे प्रभु सोशल समाजाची सहल

समाजाची एक दिवसीय वर्षासहल यंदा रविवार दि. २४ जुलै २०१६ रोजी 'मनोरी' येथील 'किणीज रिसॉर्ट' येथे नेण्यात आली. नेहमीच्या उत्साहाने काही जुने-काही नवे मिळून एकूण ५६ सभासद सहलीत सहभागी झाले होते. सहलीची एक मोठी बस चर्नीरोडवरून तर, दुसरी छोटी बस बोरीवलीहून नियोजित वेळेनुसार निघाली. परिसर पाहूनच मंडळींना समाधान वाटले. गेल्यागेल्याच नाश्ता झाला. त्यानंतर हौशी लोकांनी आपला मोर्चा स्विमिंग पुलाकडे वळविला. वर्षासहल असूनसुद्धा पर्जन्यराजाने मात्र पाठ फिरविली होती. तरीपण कृत्रिम पावसाच्या धारांत, गाण्याच्या तालावर नाचून वर्षासहलीचा मंडळींनी आनंद लुटला. पाण्यात यथेच्छ डुंबून थकल्यावर सर्वांचे पाय भोजनाच्या दिशेने वळले. भोजनाचा खास मेन्यू होता. सर्वांनी भोजनाचा यथेच्छ आस्वाद घेतला. त्यात आईस्क्रीमचाही स्वाद होता.

त्यानंतर संगीतखुर्ची, पासिंग द पार्सल, हाऊजी या सारख्या खेळात सर्वजण सहभागी झाले. भरपूर बक्षिसे

(पान ६ कॉलम २ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ डॉ. श्री. प्रदीप गजानन विजयकर यांजकडून १३ जुलै रोजी त्यांचे सुपुत्र डॉ. श्री. तन्मय यांचा डॉ. कु. ऋतुजा हेमंत भगत हिच्याशी विवाह झाल्याप्रीत्यर्थ रु. २,५००/-

✶ श्री. विजय माधव प्रभाकर यांजकडून रु. १०००/-

✶ श्रीमती स्वाती तारकनाथ जयकरकडून त्यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. ७५०/-. स्वातीताई, वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

✶ श्री. किरण सुरेंद्र व्यवहारकर यांजकडून त्यांची कन्या कु. आरती एम्.बी.ए. झाल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

✶ श्रीमती स्वाती तारकनाथ जयकर यांजकडून त्यांचे पती श्री. तारकनाथ यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त रु. ५००/-

सर्वांचे मन:पूर्वक आभार.

## अभिनंदन

✶ श्री. आशीष प्रमोद रामदत्त नवलकर यांची 'गल्फ ऑईल लुब्रीकंट इंडिया लिमिटेड'मध्ये डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून नियुक्ती झाली. अभिनंदन.

✶ आर्किटेक्ट उज्ज्वला गोविंद आगासकर यांचा गडकिल्ल्यावर आधारित लेख २२ जुलैच्या 'लोकप्रभा'त प्रसिद्ध झाला. अभिनंदन.

✶ सौ मयुरा गुंजारव नायक, सौ. भक्ती शेट्ये आदी प्रभु ज्ञातीतील तरुण मंडळींनी 'म्युझिकल लाईफ' ही संस्था निर्माण करून त्याचा एक नृत्यगायनाचा प्रयोग कॅन्सर रुग्णांसाठी सादर केला. अभिनंदन.

✶ मुंबईतील 'बेस्ट'(बसेस)बद्दल 'म.टा.'ने 'एक बेस्ट वाटचाल' हे पुस्तक प्रकाशित केलंय्. त्याच्या संपादिका आहेत कल्पना राणे. त्यांचं अभिनंदन.

## परीक्षेतील सुयश

**कौसिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट, नवी दिल्ली**

**दहावी**

श्री. अथर्व आशीष किर्तीकर - 'ए' ग्रेड,

**माध्यमिक शालांत परीक्षा**

नियती प्रकाश धुरंधर

३६७/५००, ७३.४० %

**एम्.बी.ए. (सिक्कीम मणीपाल विद्यापीठ)**

कु. आरती किरण व्यवहारकर ६३.७६ %

**बी. एस. सी. (हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई)**

श्री. अमरीश रोहित जयकर, ७३.३ %

**एम्.बी.ए. (मॅसॅच्युएट इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बोस्टन, युएसए)**

श्री. अनिकेत अनिल नवलकर

(पान ५ कॉलम ४ वरून)

देण्यात आली. ही बक्षिसे संयुक्त चिटणीस सौ. नीता सेंजित यांच्यातर्फे देण्यात आली. हाऊजी खेळात दोन अतिरिक्त बक्षिसे पुण्याच्या श्री. व सौ. रंजन धैर्यवानकडून तर ; शेवटच्या टप्प्याची अतिरिक्त बक्षिसे उत्स्फूर्तपणे सौ. सुप्रिया व श्री उमेशचंद्र कीर्तिकर यांच्याकडची होती.

सर्वात वयस्कर म्हणून डॉ. जतिन धुरंधर, सर्वात छोटा म्हणून विवान आगासकर, सहलीची रक्कम प्रथम भरणारे म्हणून श्री अजित नवलकर यांना बक्षिसे देऊन सन्मानित केले. सर्वांनी चहा-कॉफीसोबत गरमागरम कांदाभजीचा आस्वाद घेऊन रिसॉर्टचा निरोप घेतला. दोन्ही बस परतीच्या वाटेवर निघाल्या. बसमध्ये मंडळींना समाजातर्फे फरसाण लाडूचे पॅकेट, सौ. वीणा कोठारेंकडची क्रीम वेफर्स बिस्किटे, विश्वस्त वंदना नवलकर, उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर व श्री अभिजीत विजयकर यांच्यातर्फे पेपरमिंट दिले; तर जेवणानंतर 'स्वीटडीश' म्हणून सौ. नूतन कीर्तिकरांनी नरम बुंदीचे लाडू दिले. अशा तऱ्हेने सर्वांनी सहलीचा आनंद लुटला आणि सर्वजण आनंदाच्या पावसात चिंब भिजले.

श्री नरेश मानकर यांनी रु. २०००ची देणगी समाजाला दिली.

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

२१-७-१६ श्री. अनीश प्रवीण विजयकर, कन्या, नॉर्थ कॅरोनिनो (अमेरिका)

### नारळ साखर दिला

३०-६-१६ श्री. सुशील यामिनीकांत कोठारे, कु. श्रेया नरेंद्र भुरण (आं.ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

१३-७ १६ डॉ. श्री. तन्मय प्रदीप गजानन विजयकर, डॉ. कु. ऋतुजा हेमंत भगत (आं. ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ११-७-१६ | आर्कि. सुबोध आनंद धैर्यवान | वय ७३ | विलेपार्ले |
| २३-७-१६ | श्रीम. प्रिमरोझ नारायण राणे, | वय ९०, | सांताक्रूझ |
| २६-७-१६ | श्रीमती अनिता सुरेश अजिंक्य | वय ८३, | सांताक्रूझ |
| २७-७-१६ | श्रीम. सुशीला पांडुरंग कोठारे, | वय ८० | मालाड |
| २९-७-१६ | श्री. कुणाल मिलींद वाझकर, | वय ३३, | खार |

**बालविभाग**

## Saving The World

**-Aarti Kothare** (VIII)

The world is dwindling and we have to save it,
Why don't you all help a little bit?
Everyone will get his or her share,
If you'll really really care.

Geography is changing day by day,
This is what the news reporters say,
Now is the time to stop all this,
You have already warned by the snake's last hiss.

Saving the world is not an easy task,
Come on remove your selfish mask,
See the nature and its living forms,
Why to keep such dreadful norms?

Live and let others live is the true norm of life,
Why do you feel to cancel it with a very sharp knife?
`Please save me' our mother is crying,
What is the harm in just trying?

Cause this is the day you can change the world,
This is the day you can care the world,
This is the day you can share the world,
And this is the day you can save the world…

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा १०२ वा 'स्थापना दिन' रविवार दि. १८ सप्टेंबर २०१६ रोजी 'दामोदर सभागृह', परळ, मुंबई येथे सुप्रसिद्ध सिने-अभिनेत्री जयश्री टी-कर्नाटकी यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ३.३० वाजता साजरा होणार आहे.

याप्रसंगी ख्यातनाम नृत्यदिग्दर्शक श्री. मयूर वैद्य व सहकलाकार यांचा संगीत नृत्याचा रंगारंग कार्यक्रम सादर करण्यात येईल.

तरी या कार्यक्रमाला ज्ञातीतील बहुसंख्य बंधू-भगिनींनी उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

ज्ञातीतील सर्वांना नि:शुल्क, अगत्याचे निमंत्रण....!

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67